जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट दि.१२.१०.२०२४

# ‘‘महात्मा फुले चौक पो. स्टे. कल्याण तीन घडफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस’’

महात्मा फुले चौक पो. स्टे. कल्याण हद्दीत दिनांक ०७.१०.२०२४ रोजी रात्रौ २०.५२ वा. फिर्यादी श्री.कल्पेश अशोक अहिरे, वय ३२ वर्षे, रा.आधारवाडी, कल्याण पश्चिम यांनी तक्रार दिली की, दिनांक ०१.१०.२०२४ रोजी दुपारी १४:०० वाजता ते दिनांक ०५.१०.२०२४ वा. रात्रौ २१.३० वा. च्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे रितेश अपार्टमेंट, ओम एनक्वेव्हच्या बाजुला हॉटेल डिव्हाईन जवळ कल्याण पश्चिम येथील खिडकीची ग्रिल कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन त्याद्वारे गोडावुनच्या आतमध्ये प्रवेश करून, गोडावुन मधील टी.व्ही., मॉनिटर, घडयाळ, गॅस शेगडी, स्पिकर इ. साहित्य अशा एकुण ३८,०००/— रू. किमंतीचा माल घरफोडी चोरी करून नेला आहे. सदर घटनेबाबत महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे I १०२२/२०२४ भा.न्या.सहीता कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/श्री.ज्ञानेश्वर साबळे यांनी अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास पथक तयार केले होते. तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीशीर माहितीचे आधारे सापळा रचुन वॉच करून इसम नामे विकास ज्ञानेश्वर टेमघरे वय २२ वर्षे, रा.शिवमंदिर जवळ, म.पा.बिल्डींगचे मागील बाजुस, बिर्ला कॉलेज रोड, इंदिरानगर, कल्याण पश्चिम तसेच त्याचे साथीदार दोन विधीसंघर्ष बालक यांना दिनांक ०९/१०/२०२४ रोजी ताब्यात घेवुन आरोपीत नामे विकास ज्ञानेश्वर टेमघरे वय २२ वर्षे, यास अटक करून त्यास विश्वासात घेवून त्याच्याकडे तपास केला असता, त्याने त्याचे साथीदारासह घरफोडीचे गुन्हे केले असल्याचे सांगीतले. त्याने महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे हद्दीत अशा एकुण ३ घरफोडीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे तसेच मुख्य आरोपीत विकास ज्ञानेश्वर टेमघरे याचेविरूध्द यापुर्वी ६ गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्हयाचा तपास पोहवा/८०८५ जे.जी.चौधरी हे करीत आहेत. सदर अटक आरोपीकडुन खालील गुन्हे उघडकीस आलेले असुन त्याचेकडुन ३ गुन्हयातील एकुण ८१,६८०/— रू. किमंतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.न. | पोलीस स्टेशन | गु.रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| ०१ | महात्मा फुले चौक पो. स्टे. | I १०२२/२०२४ भा.न्या.सं. कलम ३३१(३), ३३१ (४), ३०५ (अ) प्रमाणे |
| ०२ | महात्मा फुले चौक पो. स्टे. | I ८३८/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०५(ए) प्रमाणे |
| ०३ | महात्मा फुले चौक पो. स्टे. | I ९९४/२०२४, भा.न्या.सं. कलम ३३१(४), ३३१ (५), ३०५(अ) प्रमाणे |

वरिल नमुद गुन्हयात उत्कृष्ठ कामगिरी अपर पोलीस आयुक्त श्री.संजय जाधव सो., पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, श्री.अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त, श्री.सुर्यकांत जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/श्री.ज्ञानेश्वर साबळे, पोउपनिरि/तानाजी वाघ, पोहवा/८०८५ जितेंद्र चौधरी, पोहवा/३८६५ मनोहर चित्ते, पोना/७०८३ आनंद कांगरे, पोना/७१८० किशोर सुर्यवंशी, पोशि/३०९३ दिपक थोरात यांनी केली आहे.



( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर